# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 21/02/2023 (मंगळवार) सकाळ

---

### जबरी चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत १८ कि.मी. अंतरावरील गोंडी मोहगांव शिवार येथे दिनांक २०/०२/२०२३ चे १७.३० वा. ते १८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– आसाराम रामचंद्र कावडकर, वय ६० वर्ष, रा. गोंडी मोहगांव हे नमुद घटनास्थळी आपल्या शेतीची पाहणी करायला गेले असता यातील आरोपी नामे– १) स्वप्नील धुर्वे २) ओंकार युवनाते पोन्हे रा. गोंडी मोहगांव हे शेतीमध्ये फिर्यादीने लावलेली सोलर झटका मशीन बॅटरी चोरी करून घेवुन जात असताना फिर्यादीला दिसल्याने यावरून फिर्यादीने हटकले असता दोन्ही आरोपीतांनी सोलर झटका मशीन बॅटरी खाली ठेवुन फिर्यादीला दोन्ही आरोपीनी हात पाय पाठीवर, चेहऱ्यावर व शरीराचे इतर भागाला हातभुक्कीने मारहाण केली व नंतर दोन्ही आरोपींनी फिर्यादीला खाली पाडुन लाथाने मारहाण केली व सोलर झटका मशीन बॅटरी टाकुन पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीतांविरुध्द कलम ३९४, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक लोंदे मो. न. ९३७०३२१६९५ हे करीत आहे.

### चोरी

१) पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत मौजा इकोनॉमीक्स कंपनी सावंगा येथे दिनांक १७/०२/२०२३ चे ०९.३० वा. ते २१.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– मनिष कुमार श्रीपुरनेंदु दलाल, वय ५२ वर्ष, रा. ह. मु इकोनॉमीक्स कंपनी सावंगा याच्या बॅग मधून कोणीतरी अज्ञात चोराने एटीएम चोरून नेवून त्यामधून नगदी २०,०००/–रू काढून घेतले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक ब. नं. २०३३ सुनिल ठोंबरे हे करीत आहे.

२) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील मौजा माथनी शेत शिवार येथे दिनांक १७/०२/२०२३ चे २०:०० वा. ते दिनांक १८/०२/२०२३ चे ०६:०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– मोहन रवा रब्बार, वय ४० वर्षे, रा. किडाणा ता. अजार जि. भुज कच्छ राज्य गूजरात ह. मु. माथनी ता. मौदा यांच्या मालकीच्या ४०० मेंढी असुन माथनी शेतशिवार येथे दिनांक १७/२/२०२३ रोजी सकाळी ६.०० वा. दरम्यान फिर्यादी हे झोपुन उठले असता त्याला ४०० मेंढी पैकी ५० मेंढया कमी दिसल्या त्यावेळी फिर्यादी यांने आजु बाजुच्या गावामध्ये शोध घेतला असता ५० मेंढया प्रत्येकी किंमती अंदाजे २०००/–रू एकुण किंमती १,००,०००/–रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार यंगलवार बं. नं. ११७४ पो.स्टे. मौदा हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर